




**Kedar Bhide**
Founder & President of
Reptile Rescue and Study Center
(RRSC) in Mumbai.


Kedar started learning about snakes under guidance of Mr. Neelimkimar Khaire in 1992 at Katraj snake park. After finishing Post Graduate in Applied Biology from the renowned Haffkine Institute, Mumbai in 1995, Kedar is presently working in the leadership position at a multinational company in the field of Public Health. As a researcher and conservationist, he has done research on snake venom and other animal borne diseases at Haffkine Institute. He has the first reports of 2 snakes from India; one from Rajsthan, *Lytorhyncus paradoxus*, Sind Awl Headed Snake and second from Arunachal Pradesh, *Protobothrops kaulbacki*, Kaulbacki's pit viper. The second finding also led to a documentary on Animal Planet called, 'When Bamboo Flowers'. He has received the prestigious, 'Sarpmitra' (Friends of snakes ) award in 2008, from Indian Herpetological Society for his work towards the field of herpetology. Presently he is working on the South Asian Snake bite initiative with other eminent herpetologists.

छायाचित्र : रमण कुलकर्णी


प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर
वनभवन, रामगिरी रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१
www.mahaforest.nic.in


# मानव-सर्प संघर्ष हाताळण्यासाठी प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धती

## (SOP-Standard Operating Procedure)




प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य
नागपूर

# मानव-सर्प संघर्ष हाताळण्यासाठी प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धती

(SOP-Standard Operating Procedure)

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य
नागपूर

२०१६

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन



मानव आणि सर्प संघर्ष, प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धती (SOP) ही छोटीशी पण महत्त्वपूर्ण पुस्तिका सादर करताना मला खूप आनंद होत आहे. जगभरात सापाच्या २९०० प्रजाती आढळून येतात आणि भारतीय उपखंडामध्ये २७० प्रजाती आढळतात. लोकांना सापांबद्दल प्राथमिक माहिती देण्याकरिता आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचे शिक्षण देण्याकरिता या छोट्या पुस्तिकेचा उपयोग होईल असा माझा विश्वास आहे.

हे कार्य कमीत कमी काळात पूर्ण केल्याबद्दल मी संपूर्ण संकलन टीमचे अभिनंदन करतो!

**सुधीर मुनगंटीवार**
मंत्री (वित्त व नियोजन, वने)
महाराष्ट्र राज्य



मृत्यूच्या कारणासंबंधी राष्ट्रीय सर्वेक्षणानुसार, भारताच्या रजिस्ट्रर जनरल आणि ग्लोबल हेल्थ रिसर्च (जागतिक आरोग्य संशोधन) ने दिलेल्या माहिती प्रमाणे देशात प्रतिवर्षी संर्पदंशाने ४६,००० मृत्यू होतात. (मिलियन डेथ स्टडी २००१-२००३) यापैकी जास्तीत जास्त मृत्यू हे नाग, मण्यार, घोणस आणि फुरसे या चार मुख्य विषारी सापांमुळे होतात. सर्पदंशाने होणारे मृत्यू टाळण्याकरिता ही पुस्तिका उपयोगी ठरेल.

कमीत कमी वेळेत हे काम पूर्ण केलेबद्दल मी संकलन टीमचे अभिनंदन करतो.

शुभेच्छा !

**विकास खारगे,** आय.ए.एस.,
सचिव (वने)
महसूल आणि वन विभाग,
महाराष्ट्र राज्य



थोडक्यात पण परिपूर्ण अशा पद्धतीने तयार करण्यात आलेली प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धती (SOP) ही पुस्तिका वनविभागाचे कर्मचारी तसेच सर्पमित्र व सर्वसामान्य नागरिकांना अत्यंत उपयोगी ठरणारी आहे. SOP च्या कार्यप्रणालीने मनुष्याला होणारे सर्पदंश टाळण्यास मदत होणार आहे.

मानव व सर्प संघर्ष हाताळण्यासाठी प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धती तयार करण्यासाठी गठित केलेल्या समितीचे अभिनंदन करतो !

**सरजन भगत** आय.एफ.एस.,
तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक, वनविभाग
वनबल प्रमुख
महाराष्ट्र राज्य, नागपूर





निसर्ग परिसंस्थेत मधल्या फळीतील भक्षकांमध्ये सर्पांचे प्रमाण लक्षणीय आहे. सर्पांशिवाय त्यांचे भक्ष्य असणाऱ्या प्रजातींच्या संख्येत अनैसर्गिक वाढ होईलच आणि सर्प ज्यांचे खाद्य आहे अशा प्रजातींचा संघर्ष वाढेल. थोडक्यातच सर्व अन्नसाखळी विस्कळीत होईल. सर्प हे नैसर्गिक कीटक नियंत्रकाचे (Natural Pest Control) कार्य करतात. बरेचदा निव्वळ गैरसमजामुळे बरेच बिनविषारी साप मारले जातात. या कारणांमुळे सर्पांसंबंधी प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धती (SOP) तयार करण्याची गरज भासली.

निसर्गप्रेमींसोबत संपुर्ण समाजाला उपयोगी ठरेल अशी पुस्तिका तयार केल्याबद्दल मी संकलन टीमचे मनापासून अभिनंदन करतो!

**श्री भगवान,** आय.एफ.एस.,
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
महाराष्ट्र राज्य, नागपूर



वनक्षेत्रापासून ते अगदी ग्रामीण व शहरी वस्त्यांपर्यंत साप आढळून येतात. शहरी भागात प्रमुख चार विषारी साप वगळता सहसा बिनविषारी साप असतात. भितीपोटी अनेकदा हे साप मारले जातात. विषारी सापाचा दंश झाल्यावर योग्य उपचार पद्धती न केल्याने व अंधश्रद्धेपोटी चुकीचे उपाय केल्यामुळे अनेकांचा मृत्यू होतो. हे टाळण्यासाठी व एक प्रमाणभूत पद्धत प्रचलित करण्याच्या दृष्टीने ही SOP तयार करण्यात आलेली आहे. यातून साहजिकच मानव व सर्प यांच्यातील संघर्ष कमी करण्यास मदत होणार आहे.

**डॉ. मोहन झा** आय.एफ.एस.,
अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(वन्यजीव) पश्चिम मुंबई
(समिती अध्यक्ष)

# प्रस्तावना



अन्न साखळीत सर्पांना महत्त्वाचे स्थान आहे. पिकांचे नुकसान करणाऱ्या उंदरांवर नियंत्रणाचे प्रमुख कार्य हे साप करत असतात. समाजामध्ये सर्पांविषयी अनेक गैरसमज व अंधश्रद्धा प्रचलित आहेत, आणि या अज्ञानातूनच सर्प व मनुष्यप्राणी संघर्ष निर्माण होतो. खरे तर सर्पांना वन्यजीव कायदा १९७२ अन्वये संरक्षण प्राप्त आहे. ग्रामीण भागांमध्ये तसेच शहरांमध्ये अनेक सर्पमित्र आपले कार्य चोखपणे बजावत आहेत. पण काही सर्पमित्र साप पकडून त्यांचे खेळ करत असल्याचे व त्यांच्या विषाची तस्करी करत असल्याचे निदर्शनास आले आहे. अनेक सर्पमित्रांचा मृत्यू हा सर्पदंशाने झाल्याचेही दिसून येते. सर्प मानवी वस्तीत आल्यास काय करावे, काय करु नये, सर्पदंश झाल्यास काय करावे, काय करु नये या सर्व गोष्टी शास्त्रीय पद्धतीने वनकर्मचारी, सर्पमित्र व सर्वसामान्य नागरिक यांच्यापर्यंत पोहचाव्यात या दृष्टीने मा. मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांच्या मार्गदर्शनाखाली मानव व सर्प संघर्ष टाळण्यासाठी (SOP) समिती गठित करण्यात आली. यामध्ये समिती अध्यक्ष श्री. सुरेश थोरात तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, बोरीवली यांची नियुक्ती करण्यात आली.

या समितीमध्ये वन्यजीव संबंधी कामात सहभाग असणारे शासकीय, अशासकीय संस्था सदस्य, या विषयातील तज्ज्ञ , मानद वन्यजीव रक्षक यांची नियुक्ती करण्यात आली होती. या अनुषंगाने विभागीय वन अधिकारी, सांगली यांचे कार्यालयामध्ये समिती सदस्यांची दि. ११-७-२०१५ रोजी बैठक पार पडली. समिती सदस्यांनी यावेळी SOP तयार करणेबाबत आपले मत विषद केले. प्रामुख्याने श्री. पापा पाटील, मानद वन्यजीव रक्षक, सांगली व श्री. रमण कुलकर्णी, मानद वन्यजीव रक्षक, कोल्हापूर यांनी आपले अनुभव विषद केले. ही SOP तयार करणे कामी प्रामुख्याने श्री. केदार भिडे, रेप्टाईल रेस्क्यु ॲण्ड स्टडी सेंटर, मुंबई यांनी शास्त्रोक्त माहिती देण्याचे काम केले. उभयचर व सरीसृप वर अभ्यास करणारे नॅशनल सेंटर ऑफ बायोलॉजीकल सायन्स, बेंगलोरचे संशोधक श्री. वरद बी. गिरी यांनी सुधारणा सुचविल्या. या सर्व बाबींचे एकत्रिकरण करणेकामी श्री. रंगनाथ नाईकडे,उप वनसंरक्षक (प्रा.) कोल्हापूर, श्री. रमण कुलकर्णी, मानद वन्यजीव रक्षक, कोल्हापूर व श्री.हरीष कुलकर्णी यांनी मोलाचे सहकार्य केले. श्री. रमण कुलकर्णी यांनी एकत्र मांडणी व छायाचित्रे उपलब्ध करुन दिली.

या SOP च्या कार्यवाहीने मानव व सर्प संघर्ष कमी होण्यास मदत होणार आहेच पण वनकर्मचारी, सर्पमित्र व सर्वसामान्य नागरिक यांना योग्य मार्गदर्शन होण्यास मदत होणार आहे.

**डॉ. व्ही. क्लेमेंट बेन** भा.व.से.
मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक
सह्याद्री व्याघ्र राखीव, कोल्हापूर
(समिती सचिव)



# मानव आणि सर्प संघर्ष, प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धती

(SOP-Standard Operating Procedure)

**शिर्षक** : मानव आणि सर्प संघर्ष, प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धती (SOP)

**विषय** : सर्प व सर्पदंशामुळे उद्‌भवणारी परिस्थिती हाताळणे

**संदर्भ** : राज्यस्तरीय सल्लागार समिती

**सारांश** : सर्पांमुळे किंवा सर्पदंशामुळे उद्‌भवणाऱ्या प्रसंगात घ्यायची प्राथमिक काळजी अथवा उपायासंदर्भात माहिती या पुस्तिकेत आहे.

**व्याप्ती** : जंगल, ग्रामीण भाग तसेच निमशहरी भाग, बाकी काही भाग जिथे अशी परिस्थिती उद्‌भवू शकते तिथे सर्प आणि मानव संघर्ष, प्रमाणभूत प्रचलित कार्यपद्धती (SOP) लागू होते.

**जबाबदारी** : सर्पदंशाची माहिती स्वतः सर्पदंश झालेल्या व्यक्तिने, नातेवाईकांनी अथवा इतर व्यक्तींनी दिल्यास संबंधित कर्मचाऱ्याची कार्यवाहीची जबाबदारी राहील.



© Varad B. Giri

# चला जाणून घेऊ या सर्पांविषयी

साप हे पृष्ठवंशीय प्राणी असून ते पूर्णपणे मांसाहारी आहेत. माणूस, माकड, ससा इ. प्राण्यांप्रमाणेच त्याला पाठीचा कणा असतो. फुफ्फूस, मुत्रपिंड, अंडाशय इ. अवयव असतात. इतर प्राण्यांमध्ये या अवयवांच्या जोड्या असतात. मात्र, सापाचे शरीर लांबट असल्याने सापाच्या शरीरातील हे अवयव एकामागोमाग एक असतात. साप हे शीतरक्ती (Cold Blooded) आहेत. साप सस्तन प्राणी नसल्याने दूध पीत नाहीत. त्यांना आवाजाचे ज्ञान जमिनीतील कंपनांनी होते. सापांचे गंधज्ञान उल्लेखनीय असते तसेच एकाच वेळी दोन्ही डोळ्यांनी दोन वेगवेगळी दृष्ये ते पाहत असतात. हलणारे भक्ष्य किंवा वस्तू त्यांचे लक्ष वेधून घेतात. पावसाळ्याच्या सुरवातीस सापांची पिल्ले जन्मास येतात. भारताच्या धान्य उत्पादनातील ५% हिस्सा उंदीर फस्त करतात. उंदरांवर नियंत्रणाचे कार्य नाग आणि धामण यासारखे साप करतात. त्यामुळेच ते शेतकऱ्यांचे व आपले मित्र आहेत. सर्वच साप विषारी नसून अनेकदा सर्पदंश हे बिनविषारी सापांचे असतात. विषारी सापांपैकी प्रामुख्याने शेतांमध्ये तसेच नागरी वस्तीजवळ आढळणारे चार प्रमुख विषारी साप नाग, घोणस, मण्यार व फुरसे हे आहेत.

## सर्वसामान्यपणे आढळणारे चार प्रमुख विषारी साप




© Raman Kulkarni

**Common Krait** *Bungarus caeruleus*
**मण्यार**




© Raman Kulkarni

**Russell's Viper** *Doboia russelii*
**घोणस**



© Raman Kulkarni

**Saw-scaled Viper** *Echis carinatus*
**फुरसे**



© Varad B. Giri


**Spectacled Cobra** *Naja naja*
**नाग**

**आम्हालाही या जीवन सृष्टीत महत्त्वाचे स्थान आहे, कृपया याचा विसर पडू देऊ नका. आमची हत्या करु नका, आम्हालाही जगू द्या.**


सापांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ अन्वये संरक्षण देण्यात आले आहे.



# शरीर रचना




# विषारी सर्प




© Raman Kulkarni


© Raman Kulkarni

## कात :

सापाची कातडी कडक खवल्यांची बनलेली असते आणि त्यामुळे त्यांची वाढ खुंटण्याची शक्यता असते. असे होऊ नये म्हणून सापाला त्याच्या शरीरावर असलेले पातळ कातीचे आवरण ठराविक काळानंतर काढावे लागते. बहुतांशी साप साधारणत: दर दोन तीन महिन्यांनी कात टाकतो.


© Raman Kulkarni


© Raman Kulkarni

## रंग :

निसर्गाने सापांना वेगवेगळे रंग दिले आहेत. ते त्यांच्या संरक्षणासाठी; तसेच भक्ष पकडणे सोपे जावे म्हणून. त्यांचे विविध रंग मोठे मनमोहक असून त्यांचे रंग सभोवतालच्या वातावरणात एकरूप होणारे असतात.


© Raman Kulkarni


© Raman Kulkarni

## डोळे :

सापांच्या ज्ञानेंद्रियातील सर्वात महत्वाचे इंद्रिय म्हणजे डोळा. साप एकाच वेळी दोन्ही डोळ्यांनी दोन वेगवेगळी दृश्ये पाहत असतात. हलणारे भक्ष्य किंवा वस्तू त्यांचे लक्ष वेधून घेतात. सापांच्या डोळ्यांना आपल्यासारख्या पापण्या नसतात. सापाला चक्षू:श्रवा म्हणजे डोळ्यांनी ऐकणारे म्हटले जाते.




© Raman Kulkarni


© Raman Kulkarni

## श्रवण :

सापांना आपल्यासारखे बाह्यकर्ण, मध्यकर्ण, पटल, कर्णअस्थिका, कर्णनलिका नाहीत. सापांना अंत:कर्ण असतात. सापांना आवाजाचे ज्ञान जमिनीतील कंपनांनी होते.


© Raman Kulkarni


© Raman Kulkarni

## गंध :

सापाचे गंधज्ञान उल्लेखनीय असते. सर्व सापांना टाळूमध्ये गंधग्राहक (Jacobson's organ) ग्रंथी असतात. सापाची जीभ लांब असून, टोकाजवळ दुभागलेली असते. भक्ष्य शोधताना साप जीभ सारखी आत–बाहेर करीत असतो. जिभेच्या दोन्ही टोकांच्या सहाय्याने साप हवेतील सूक्ष्म धुलीकण आणि गंधकण गोळा करून टाळूत असलेल्या गंधग्राहक ग्रंथीत नेतो. या ग्रंथीमध्ये गोळा केलेल्या धूलीकण आणि गंधकणांचे पृथ:करण केले जाते आणि सापाला गंधज्ञान होते.


© A. Captain/Indian Herp. Society

*Ptyas mucosa* hatching


© Romulus Whitaker

*Naja naja* hatchlings

## प्रजनन :


पावसाळ्याच्या सुरवातीस सापांची पिल्ले जन्मास येतात. यामध्ये दोन प्रकार आहेत. एक म्हणजे अंडज (oviparous) सर्प यामध्ये मादी अंडी घालते. दुसरा प्रकार आढळतो तो पिल्लांना जन्म देणाऱ्या जारज (ovo-viviparous) सर्पांचा. अंडी देणाऱ्या सापांमध्ये नाग, मण्यार, धामण, अजगर इत्यादी सापांचा समावेश होतो. तर घोणस, फुरसे, चापडा यासारखे साप पिल्ले प्रसवतात. नागराजाची (King Cobra) मादी वगळता इतर कोणत्याही जातीचा साप घरटे करत नाही.



© Varad B.Giri

**भक्ष्य :**

साप हे मांसाहारी प्राणी आहेत. प्रत्येक साप आपले भक्ष्य पूर्णपणे गिळंकृत करतो. उंदीर, पाली, घुशी, सरडे, बेडूक आणि मासे हे सापाचे प्रमुख अन्न असले तरी बरेचसे साप झाडांवरील घरट्यामध्ये असलेली पक्ष्यांची अंडीसुद्धा खातात. काही साप तर स्वजात भक्षक (CANIBALS) असून ते इतर जातींच्या सापांवर गुजराण करतात. नागराज किंवा मण्यार सारख्या विषारी सापांच्या खाद्यात इतर विषारी व बिनविषारी सापांचा समावेश होतो. साप तोंडाच्या विशिष्ट रचनेमुळे ते स्वत:पेक्षाही मोठ्या आकाराचे प्राणी गिळू शकतात. विषारी साप भक्ष्याला पकडून मारण्यासाठी विषाचा उपयोग करतात. हे विष इंजेक्शनच्या सुईप्रमाणे पोकळ असलेल्या सुळ्यांद्वारे भक्ष्याच्या शरीरात टोचले जाते.






छायाचित्रे : रमण कुलकर्णी, वरद बी. गिरी

# मानव आणि सर्प संघर्षासंबंधी कृती/कार्यवाही

## अ) मानवी वस्तीत साप आढळून आल्यास :

१. तक्रारदारांच्या कॉलला ताबडतोब प्रतिसाद देणे.

२. तक्रारदाराने दिलेली माहिती – नाव, पत्ता, संपर्क क्रमांक इत्यादीची नोंद करणे.

३. त्याठिकाणी असणाऱ्या व्यक्तिंना करावयाचे मार्गदर्शन :
   - शांत राहण्यास सांगावे.
   - सापापासून सुरक्षित अंतर ठेवण्यास सांगावे.
   - पाळीव प्राणी अथवा लहान मुलांना दूर करावे.
   - सापाला डिवचू अथवा मारु नये.
   - सापाच्या हालचालीवर लक्ष ठेवावे.

४. त्यानंतर जवळच्या कमीत कमी दोन नोंदणीकृत सर्पमित्रांना संपर्क करावा. जवळचा सर्पमित्र उपलब्ध नसल्यास दुसऱ्या सर्पमित्रांना संपर्क करावा.

५. ताबडतोब उपलब्ध कर्मचारी आणि उपकरणे (गरजेची असल्यास) घेऊन संबंधित स्थळी जावे.

६. सर्पमित्राला सहकार्य करावे.
   - तक्रारदाराकडून मदत घ्यावी अथवा जमाव झाल्यास जमावाकडून मदत घ्यावी.

७. सर्प वाचविण्याचे सर्व शिष्टाचार पाळावेत. ( परिशिष्ट १)

८. सर्पमित्र उपलब्ध नसल्यास, साप पकडण्याचा प्रयत्न करु नये. त्याऐवजी लांब काठी अथवा टोकाला आकडा असणारी वायर घेऊन सापाला उचलून मानवी वस्तीपासून दूर सुरक्षित स्थळी सोडावे.

९. मानवी वस्तीत सापांचा आढळ टाळण्याकरिता करण्याच्या अथवा टाळण्याच्या गोष्टी परिशिष्ट २ मध्ये दिल्या आहेत.



## ब) मानवाला झालेला सर्पदंश :

१. तात्काळ जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्र/दवाखाना/वन विभाग/नातेवाईक अथवा टोल फ्री क्रमांक १०८ ला वैद्यकीय मदतीसाठी संपर्क साधावा.

२. संबंधीत व्यक्तिला सापाचे शक्य तितके अचूक वर्णन सांगावे. त्यामुळे योग्य ती तयारी करुन येण्यास मदत होईल.

३. लक्षणे दिसून येण्याची वाट पाहू नका. त्यामुळे तुमचा महत्त्वाचा वेळ वाया जाईल आणि तात्काळ वैद्यकीय सेवेपासून तुम्ही वंचित राहू शकाल.

४. वैद्यकीय सेवा उपलब्ध असल्यामुळे धोका नसल्याची सर्पदंश झालेल्या व्यक्तिला जाणीव करुन द्या. बरेचदा बिनविषारी सर्पदंश असल्याचे सांगून, घाबरुन जाणार नाही याची काळजी घ्या.

५. शांत रहा. सर्पदंश झालेल्या व्यक्तिला धीर द्या. घाबरुन गेल्यामुळे भीतीने उत्तेजित होऊन हृदयाचे ठोके वाढून रक्ताभिसरणाचे वेग वाढतो त्यामुळे विष जास्त वेगाने पसरते.

६. सर्पदंश झालेल्या व्यक्तिला शक्य तितके आरामदायी व उबदार ठेवा.

७. त्या व्यक्तिला जमिनीवर झोपवा. दंश झालेला भाग हृदयाच्या वर राहणार नाही याची काळजी घ्या.

८. ज्या ठिकाणी दंश झालेला आहे त्याच्या आजूबाजूच्या भागावरील बुट, अंगठी, घड्याळ, दागिने अथवा घट्ट कपडे काढून टाका. त्यामुळे धमनीवर दाब पडून सूज येऊ शकते.

९. दंश झालेला पाय स्थिर ठेवा. (फ्रॅक्चर झाल्यावर ठेवतात तसा). कॉटन बॅण्डेज अथवा स्वच्छ कापडाने बॅण्डेज करा.

१०. तत्परतेने दवाखान्यात न्यावे. दंश झालेल्या व्यक्तिला स्वत: ड्राईव्ह करायला देऊ नका. कारण विषामुळे अंधुक दिसणे, चक्कर येणे अशी लक्षणे दिसून येतात व त्यामुळे वाहनावरचा ताबा सुटण्याची शक्यता असते.

११. सापाला मारण्यात वेळ घालवू नये. शक्य असल्यास फोटो काढावा/काढण्यास सांगावे. ज्यामुळे सापाची योग्य ओळख करता येईल. प्रत्येकवेळी सापाची ओळख झालीच पाहिजे हे सक्तीचे/गरजेचे नाही.

१२. सर्पदंशाची वेळ, लक्षणे आणि केलेले प्राथमिक उपचार याची नोंद ठेवावी. संबंधित वैद्यकिय व्यक्तीला ही माहिती द्यावी. यामुळे डॉक्टरांना आणि विष तज्ञांना विषाची तीव्रता समजण्यास व योग्य उपचार करण्यास मदत होईल.



१३. दंश झालेल्या व्यक्तीला एखाद्या औषधाची, खाद्यपदार्थाची अथवा प्राण्याची ॲलर्जी असल्यास तशी काळजी घ्यावी. त्या व्यक्तीला असणाऱ्या आजाराची पण माहिती पुरवावी.

१४. शक्य झाल्यास हृदय व फुफ्फूस पुनर्जीवन (CPR) आणि शॉक उपचार पद्धतीची तयारी करावी.

१५. परिशिष्ट–३ मध्ये दिलेल्या बाबीं व्यतिरिक्त काहीही करु नका.

१६. महाराष्ट्राच्या ग्रामीण आणि शहरी भागात सर्पदंश हा पर्यावरण, व्यवसाय अथवा हवामानाशी संबंधित धोका आहे.

## क) पाळीव प्राणी अथवा गुरांना सर्पदंश :

१. जनावरांच्या डॉक्टरांना बोलवण्यापूर्वी जनावराला विषारी साप चावला असल्याची निश्चिती करण्याचा प्रयत्न करा. प्राण्यांच्या शरीरावर केस असल्यामुळे दंश झालेली जागा शोधणं सहज शक्य होत नाही पण सूज किंवा रक्त आलं आहे का हे तपासावं. मोठा साप अथवा अजगर असेल तर दातांच्या खूणा दिसून येतात. आणि रक्तस्त्राव होताना दिसतो.

२. तुम्हाला जर जनावराला सर्पदंश झाल्याचे आढळून आल्यास अथवा तशी शंका आल्यास वैद्यकीय मदती करता जनावरांच्या डॉक्टरांशी संपर्क साधावा.

३. जनावराच्या नाकाला दंश झाला असल्यास सुज येऊन श्वसनाला अडथळा निर्माण होतो. अशावेळी नाकातून वरच्या दिशेला स्वच्छ प्लास्टिकच्या पाईपचा तुकडा सरकवावा जेणेकरून उपचार उपलब्ध होईपर्यंत श्वसन सुरु राहील.

४. जनावरांना शांत ठेवण्याचा प्रयत्न करा. डॉक्टरांना जनावर असणाऱ्या ठिकाणी बोलवा, जनावराला डॉक्टरकडे नेताना हालचालीमुळे हृदयाचे ठोके वाढून रक्ताभिसरण जोराने होते व विष शरीरात सर्वत्र वेगाने पसरते.

५. जखमेला काप देऊन तोंडाने शोषून विष काढण्याचा प्रयत्न करू नये यामुळे तुम्हालाही विषबाधा होण्याचा धोका असतो.

६. नागाचा दंश असल्यास दंश झालेल्या ठिकाणाच्या वरच्या बाजूला बँडेज पट्टी बांधावी, आणि पायाच्या वर पर्यत गुंडाळावी. हे बँडेज धमनीवर दाब आणून रक्तस्त्राव थांबवण्याचं कार्य करत नाही तर लसिका प्रणाली मध्ये विषाचा होणारा शोषणाचा वेग कमी करतं. व्हायपर चा दंश असल्यास बँडेज बांधू नये, या दंशामुळे सूज येते अशावेळी बँडेज उपयोगी नाही तर घातक ठरू शकते.

७. व्हायपर चा दंश असल्यास जनावराला जास्तीत जास्त शांत /स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करा आणि लवकरात लवकर वैद्यकीय उपचार करा.

८. गरम अथवा गार शेक देऊ नये त्यामुळे आणखीनच टीश्यू डॅमेज होतो.

९. (ॲन्टी–व्हेनम) प्रती विष हा एकमेव सिद्ध उपचार असल्याने दुसरा कोणताही उपचार करू नये.

१०. दंश झाल्याची वेळ, दिसून आलेली लक्षणं आणि केलेले प्राथमिक उपचार यांची नोंद ठेवावी.

११. जनावराच्या डॉक्टरांना मदतनीस पुरवावा.

१२. डॉक्टरांनी उपचारानंतर सांगितलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करावे. जनावराचे निरिक्षण करत रहावे आणि कोणता दुष्परिणाम दिसून आल्यास डॉक्टरांना त्वरीत कळवावे.



# परिशिष्ट - १

## साप वाचवताना आणि पुनर्वसन करताना पाळावयाचे नियम

१. अगदी गरजेचे असेल तेव्हाच सापाला रेस्क्यु करावे.

२. सुरक्षितपणे साप पकडण्याचे तंत्र जाणून घ्यावे.

३. शक्य असेल तर कायम कमीत कमी दोघांनी काम करावे.

४. सर्पाला कमीत कमी हाताळावे. (प्रत्येक सापाला दोनदाच) एकदा पकडताना आणि दुसऱ्यांदा सोडून देताना. विनाकारण हाताळणे टाळावे.

५. सर्प जखमी असल्यास पकडण्यापासून सोडेपर्यंतच्या पूर्ण प्रक्रियेत काळजी घ्यावी. एकातून दुसऱ्या पिशवीत अथवा बॉक्स मध्ये घालत असताना अत्यंत काळजी घ्यावी (सहसा असे करणे टाळावे.)

६. सर्पाला चोवीस तासाच्या आत सोडून द्यावे.

७. प्रत्येक रेस्क्युची नोंद ठेवावी. ( पकडण्यापासून–सोडण्यापर्यंत) आणि नियमितपणे वन विभागाला सादर करावी.

८. प्रथमोपचाराची माहिती करून घ्या. आणि स्वत: बरोबर Safe Snakes कार्ड बाळगा. ज्यामध्ये जवळचे हॉस्पिटल, नातेवाईकांचा संपर्क क्रमांक, वैयक्तिक माहिती–रक्तगट यापूर्वी सर्पदंश झाला असल्यास त्याची माहिती (For Anti venom Sensitivity) डॉक्टर्स ना नवीन उपचारांच्या प्रोटोकॉल संबंधी मार्गदर्शन करणाऱ्या काही वैद्यकीय तज्ञांचे नंबर्स (शक्य असल्यास) जवळच्या वन विभाग कार्यालयाचा क्रमांक आणि पोलिस स्टेशनचा नंबर अशी माहिती असेल.

### या गोष्टी पूर्णपणे टाळाव्यात :

१. जिवंत साप बाळगणे (वैद्यकीय उपचाराची गरज असल्यास उप वनसंरक्षक (DCF) आणि वन्यजीव विभाग कार्यालयाला पूर्वसूचना द्यावी)

२. कोणत्याही हेतूने जिवंत सापांचे प्रदर्शन/शो करणे.

३. गरज नसताना साप हाताळणे.

# परिशिष्ट -२

## मानवी वस्तीत साप येऊ नयेत म्हणून करावयाचे प्रतिबंधात्मक/सक्रिय उपाय

### शिक्षण :

१. स्थानिक साप, त्याचा अधिवास, लपण्याच्या जागा, वर्षातील कोणत्या काळात जास्त दिसून येतात, ते निशाचर आहेत की दिवसा आढळून येतात, कोणत्या हवामानात ते जास्त कार्यरत असतात. अशी मुलभूत माहिती करून घ्यावी.

२. पावसानंतर, पूरपरिस्थितीत, कापणीच्या हंगामात आणि रात्रीच्या वेळी सापांबाबत विशेष सावधगिरी बाळगावी.

३. सापांपासून सुरक्षित अंतर ठेवा अगदी गारूड्यांच्या सापांपासून ही सुरक्षित अंतर ठेवावे. कधीही साप हाताळू नये, त्यांना घाबरवू नये अथवा त्याला मारण्याचा प्रयत्न करू नये.

### घरामध्ये बाळगण्याची सावधगिरी :

१. घरामध्ये कोंबड्या किंवा इतर Livestock ठेवू नये, ज्याची शिकार करण्यासाठी साप घरात येऊ शकतात. धान्यसाठा करताना उंदीर आकर्षित होणार नाहीत याची काळजी घ्यावी. वरचेवर घरात साप नाहीत ना यासाठी पाहणी करावी. घरबांधणी करताना सापांना लपण्यासाठी जागा होईल अशी रचना टाळावी.

२. घरात अथवा घराभोवती सापांच्या भक्ष्य प्रजाती कमीत कमी येतील याची काळजी घ्या. घुशी, उंदीर अथवा बेडकांना आकर्षित करतील अशा गोष्टी टाळा.

३. भंगार अथवा कचरा रचून ठेवणे टाळा. ज्यामध्ये साप आसरा घेऊ शकेल.

४. सुट्टीनंतर घरी अथवा ऑफिस मध्ये परतल्यावर साप नसल्याची खात्री करून घेण्यास घरच्या व्यक्तींना आणि कर्मचाऱ्यांना सांगावे.

५. दारे रात्री बंद ठेवावीत आणि बाहेरचे दिवे सुरु ठेवावे.

६. घराबाहेर कचरा टाकू नये त्यामुळे उंदीर आकर्षित होतील आणि परिणामी साप.

७. सापांना घरात येण्यापासून रोखण्यासाठी घरे उंचावर असावीत व बाहेरुन सिमेंटचे प्लास्टर करावे.

८. मातीच्या घराच्या भिंतींना असणारी छिद्रे मुजवावीत त्यामध्ये साप आसरा घेऊ शकतो.

९. दारापासून अथवा खिडकीपासून झाडे दूर ठेवावीत ज्याच्यावरून साप चढून आत येऊ शकतात.



### परसामध्ये/अंगणामध्ये बाळगण्याची सावधगिरी :

१. सापासाठी आसरा होतील अशा गोष्टी टाळाव्यात. अंगणातील वारुळे, कचऱ्याचे ढीग अथवा बांधकामाचं साहित्य अशा गोष्टी काढून स्वच्छ करा.

२. झाडच्या फांद्या घराजवळ येऊ देऊ नका. वाढणाऱ्या झाडा-झुडपांची वेळोवेळी छाटणी करा.

३. धान्याचे कोठार घरापासून दूर ठेवा. तिथे आकर्षित होणाऱ्या उंदरांना खाण्यास साप येऊ शकतात.

४. पाण्याचे हौद अथवा छोटे तळे सापाचे भक्ष्य असणाऱ्या बेडकांना आकर्षित करतात. प्राणी अथवा पक्षी सापाच्या अस्तित्वाचा इशारा देतात, त्याच्याकडे लक्ष ठेवा.



# परिशिष्ट -३

## काय करु नये :

१. आवळपट्टी अथवा दाब पट्टी बांधू नये. त्यामुळे रक्तप्रवाह थांबून सर्पदंशापेक्षाही जास्त वाईट परिणाम होऊ शकतो.

२. सर्पदंश झालेली जागा साबणाने, पाण्याने अथवा कोणत्याही द्रवाने धुवू नये. असे केल्यास लसिका प्रणाली (Lymphatic system) उत्तेजीत होऊन रक्तात विष मिसळण्याच्या प्रक्रियेला आणखी वेग प्राप्त होतो.

३. दंश झालेल्या ठिकाणी कापू नये अथवा छेद करु नये. घोणस, फुरसे (Viper) वर्गातील दंश असल्यास खूप मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव होतो. काप देताना स्नायुबंध अथवा रक्त वाहिनी कापली जाऊन बाधा होऊ शकते.

४. विद्युत धक्का तंत्राचा (Electric Shock) वापर करु नये.

५. दंश झालेली जागा गोठविण्याचा प्रयत्न करु नये.

६. कोणत्याही प्रकारची संभाव्य धोकादायक वनस्पती लावू नये अथवा गावठी इलाज करण्यात वेळ दवडू नये.

७. दंश झालेल्या ठिकाणी तोंडाने विष शोषण्याचा प्रयत्न करु नये. ही पद्धत अपरिणामकारक तर आहेच पण असे केल्यास अल्सर अथवा जखम होऊ शकते. विष रक्तप्रवाहात मिसळू शकते.

८. दंश झालेल्या व्यक्तिला मद्य, औषधे अथवा कोणतेही तत्सम पेय देऊ नये. असे केल्याने उपचार यशस्वी होण्यास बाधा येऊ शकते.

९. साप पकडण्याचा, हाताळण्याचा अथवा मारण्याचा प्रयत्न करु नये. बरेचदा असे करतानाच दंश झाल्याच्या घटना घडतात.

१०. पारंपारिक पद्धतीने इलाज करणाऱ्यांकडे जावु नये अथवा भोंदू वैद्याकडे जाऊ नये कारण कोणताही पारंपारीक उपचार अजून सिद्ध झालेला नाही.

११. असे पारंपारिक उपचार यशस्वी झाल्याच्या घटनांमध्ये साप बिनविषारी असल्याचे दिसून आले आहे.

१२. दवाखान्यात जाण्यासाठी लक्षणे दिसून येण्याची वाट पाहू नये.



१३. साप पकडण्याचा प्रयत्न करु नये. यामध्ये तुमच्याबरोबर इतरांनाही धोका निर्माण होऊ शकतो.

१४. दंश झालेल्या हाताला अथवा पायाला आवळपट्टी बांधू नये. यामुळे रक्तप्रवाह पूर्णपणे बंद होऊन दंश झालेला हात अथवा पाय गमावला जातो.

१५. दंश झालेल्या जागी बर्फाचा शेक देऊन थंड करण्याचा प्रयत्न करु नये.

१६. दंश झालेल्या जागी छेद करु नये अथवा कोणत्याही पद्धतीने शोषण्याचा प्रयत्न करु नये यामुळे धोका बळावून आणखीनच अपाय होतो.

# परिशिष्ट –४

## सर्पदंश टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक/सक्रिय उपाय

### घरामध्ये :

१. साप खाद्याच्या शोधासाठी किंवा तात्पुरता आसरा घेण्याकरिता घरामध्ये येवू शकतात. घरामध्ये जनावरे किंवा कोंबड्या ठेवू नये त्यांना खाण्यासाठी साप घरामध्ये येवू शकतात. धान्यसाठ्याच्या जागी उंदरांचा पूर्ण बंदोबस्त करा.

२. वेळोवेळी घरामध्ये साप नाहीत याची खात्री करावी आणि सापांना लपायला अथवा आसरा घ्यायला जागा मिळेल असे बांधकाम टाळावे. (उदा. उघड्या वळचणी असणारे कौलारु छप्पर, छिद्र अथवा भगदाड असणाऱ्या मातीच्या अथवा गवताच्या भिंती, फरशीखाली असणाऱ्या न बुजवलेल्या जागा.)

३. शक्य असेल तर जमिनीवर झोपणे टाळावे. जर जमिनीवर झोपावेच लागत असेल तर कीटकनाशकांचा वापर करुन मच्छरदाणी लावावी आणि अंथरुणाखाली ती मच्छरदाणी खोवावी. असे केल्याने डास, इतर चावणारे कीटक, गोम, विंचू आणि सापांपासून संरक्षण होईल.

४. तळमजल्यावर किंवा पहिल्या मजल्यावर राहणाऱ्यांनी आतमध्ये येणाऱ्या पाईप्स फिनाईलने वेळोवेळी स्वच्छ कराव्यात.

५. अचानक साप समोर आल्यास अगदी कमी हालचाल करावी अथवा शांत उभे रहावे. सापांला परिस्थितीचा अंदाज आला की निघून जाईल.

### शेती आवारात, कुंपण किंवा बागेत :

१. लपण्यासाठी कोणतीही जागा ठेऊ नये. वारुळ काढून टाकावे, कचऱ्याचा ढीग, बांधकामाचे सामान असल्यास घराजवळून हटवावे.

२. घराच्या जवळ येणाऱ्या फांद्या कापून टाकाव्यात.

३. गवत कापून टाकावे अथवा अगदी कमी करावे. छोटी झुडपे काढून टाकावीत. त्यामध्ये साप लपून बसतात.

४. धान्य कोठार/साठा घरापासून दूर ठेवावा. याकडे आकर्षित होणाऱ्या उंदरामागुन साप येऊ शकतात.



६. रात्री घराबाहेर पडताना अथवा शौचालयाकडे जाताना बॅटरीचा वापर करा. पायामध्ये बुट वापरावेत. चालताना पाय आपटत चालावे, सापांना कंपनाची जाणीव होऊन ते बाजूला निघून जातात.

### ग्रामीण भागामध्ये :

१. जळाऊ लाकडांचा ढीग रात्रीच्यावेळी फार धोकादायक ठरु शकतो. चालताना दक्षता घ्या. अनवाणी चालणे टाळा. चप्पल किंवा सॅण्डल ऐवजी चांगले बूट वापरा. रात्री चालताना अथवा गवतातून चालताना पॅन्ट वापरा.

२. बिळामध्ये, घरट्यामध्ये अशा कोणत्याही जागी हात घालू नका तिथे साप असू शकतात.

३. रात्री चालताना टॉर्च अथवा कोणत्याही प्रकारचा लाईट वापरा. पाऊस पडून गेल्यावर सावधानता बाळगा.

५. अर्धमेला अथवा मेलेला साप हाताळताना काळजी घ्या. अपघाताने विषदंत लागला, शरीरापासून वेगळे केलेल्या डोक्यामधला विषदंत लागला तरी विष शरीरात जाऊ शकते.

६. बरेचसे सर्पदंश नांगरणी, लागवड, कापणी करताना आणि पावसाळ्यात होतात. पावसाळ्यात वाहणाऱ्या पाण्याबरोबर रस्त्याकडेच्या गटारातून चिखल, दगडाबरोबर सापही वाहून जाताना दिसतात. जमिनीखाली राहणारे साप बिळामध्ये पाणी गेल्यावर जमिनीवर येतात. त्यामुळे पाऊस झाल्यावर रस्त्यावर चालताना सावधानता बाळगा. मुख्यत्त्वे करुन रात्री काळजी घ्या.

७. गवत कापताना, फळे अथवा भाजा काढताना आणि झाडाच्या खाली स्वच्छता करताना काठी बाळगा. पालापाचोळा अथवा गवत साफ करताना काठीचा वापर करा. साप आल्यास निघून जाण्याची संधी मिळेल. ढिगारा करुन ठेवलेले गवत उचलण्यापुर्वी काठीने हलवून त्याला तपासा.

८. बाजरी सारख्या पिकाची कापणी अथवा खुडणी करताना जमिनीकडे लक्ष ठेवा. वरच्या शेंड्यांची खुडणी होताना लक्ष वरील बाजूस केंद्रित होऊन जमिनीकडे दुर्लक्ष होते.

९. पशुखाद्य किंवा कचरा घरापासून दूर ठेवा त्याकडे उंदीर आकर्षित होतात ज्याच्या मागे साप येतात.

## रस्त्यावर :

१. सायकलस्वार अथवा वाहन चालकाने रस्त्यावरील सापावर मुद्दाम चाक घालू नये. ज्यामुळे साप अर्धवट मरु शकतो आणि पादचाऱ्यांना धोका संभवू शकतो.

२. गाडीखाली येवून जखमी झालेला साप गाडीच्या खालील बाजूस अडकला जाऊ शकतो. आणि जेव्हा वाहन थांबते किंवा पार्क केले जाते तेव्हा बाहेर येतो.

३. जर तुम्हाला रस्त्यावर मेलेला साप दिसला तर त्याला स्पर्श करु नका तत्पूर्वी तो मेला आहे की जिवंत आहे याची काठीने खात्री करुन घ्या. उचलताना पूर्ण काळजीने उचला.

## नदी, खाडी अथवा समुद्र :

१. समुद्री सापांपासून होणाऱ्या दंशापासून वाचण्याकरिता मासेमाऱ्यांनी जाळीत अडकलेल्या सापांना स्पर्श करणे टाळावे. बरेचदा डोके आणि शेपूट सहज ओळखता येत नाहीत.

२. नदी अथवा समुद्रावर आंघोळ करणाऱ्यांना सर्पदंश होण्याचा धोका असतो. विहिरीच्या अस्वच्छ पाण्यात, खाडीजवळ, नदीच्या पाण्यात अथवा काही समुद्र किनाऱ्याजवळ कपडे धुणाऱ्यानांही धोका असतो.

## जंगलामध्ये :

१. ट्रेकींगला जाताना गोल टोपी, फुल पॅन्ट, पूर्ण बाह्यांचा शर्ट आणि बूट वापरावेत.

२. जंगलामधून अथवा डोंगराळ भागात ट्रेकींग करताना मळलेल्या पायवाटांवरुनच चालावे. जिथे जमीन दिसत नाही अशा ठिकाणी पाय ठेवू नये.

३. फांदीचा अथवा दगडांचा आधार घेताना काळजीपूर्वक पहा. आधारासाठी किंवा तपासणीसाठी बळकट काठीचा वापर करा.

४. जंगलामध्ये सहज वाहून नेता येणारे तंबू वापरावेत. जमिनीवर झोपणे टाळावे. झोपण्याच्या जागेपासून ते पाणी साठ्यापर्यंत अथवा ओढ्यापासून सुरक्षित अंतर ठेवा.

५. रात्री बॅटरीचा वापर करा.

६. प्रत्येकवेळी प्रथमोपचाराचे साहित्य बरोबर ठेवा. (उदा. बॅण्डेज)

७. जंगलातून परत येताना सर्व सामान काळजीपूर्वक तपासून पहा.



## इतरवेळी :



१. सापापासून दूरच रहा. गारुड्याच्या जवळ असणाऱ्या सापांपासूनही सुरक्षित अंतर ठेवा. अशा सापांचेही वरचेवर दंश होतात.

२. सापांना कधीही हाताळू नये. सापांना कधीही घाबरवू नये अथवा त्यांच्यावर हल्ला करु नये. बंदिस्त ठिकाणी, कुंपणाजवळ असताना समोर चालून जाऊ नये.

३. सापांचा वावर असणाऱ्या ठिकाणांपासून लहान मुलांना दूर ठेवावे.

४. सर्पदंशाचा धोका असणाऱ्या व्यावसायिकांनी योग्य ती काळजी घ्यावी. उदा. तांदूळ व ऊस शेती करणारे शेतकरी, कामगार इ.




**जागतिक आरोग्य संघटनेने संशोधनाअंती एका नवीन सर्पदंश प्रथमोपचार पद्धती प्रचलित केली आहे आणि ती म्हणजे...**

# ‘DO it R.I.G.H.T.’

## R = Reassure the patient म्हणजे सर्पदंश झालेल्या व्यक्तिला धीर देणे.

(जवळ जवळ ७०% सर्पदंशांच्या घटना या बिनविषारी सापांच्या असतात. तर उरलेल्या ३०% विषारी सर्पदंशाच्या असतात. या ३०% सर्पदंशापैकी निम्म्या सर्पदंशात विष शरीरात सोडलेले नसते यालाच Dry Bites असे म्हणतात. त्यामुळे जुन्या पारंपारिक प्रथमोपचार पद्धती यशस्वी झाल्या असा आपला समज होतो.)

## I = Immobilize in the same way was a fractured limb म्हणजे सर्पदंश झालेला अवयव स्थिर ठेवणे व त्या अवयवाची हालचाल कमीत कमी होईल यासाठी प्रयत्न करणे. जसे की एखाद्या लाकडी पट्टीचा आधार देणे.

(अनेकदा घाबरून आणि घाईगडबड व गोंधळात सर्पदंश झालेल्या व्यक्तिचे रक्ताभिसरण वाढून सापाचे विष शरीरात जलद गतीने पसरते. त्यामुळे गोंधळ करु नये, शांत रहावे. अशावेळी सर्पदंश झालेला अवयव स्थिर ठेऊन विष शरीरात भिनण्याची गती कमी करुन प्राण वाचविण्यास मदत होईल.)

## GH = Get to Hospital Immediately म्हणजे लवकरात लवकर नजीकच्या सरकारी इस्पितळात घेवून जाणे.

(पारंपारिक पद्धतीने करण्यात येणारे प्रथमोपचार जसे की दंश झालेल्या ठिकाणी ब्लेडने कापून रक्तस्त्राव करणे, तोंडाने विष ओढून काढण्याचा प्रयत्न करणे, आवळपट्टी करकचून बांधणे अथवा एखाद्या मांत्रिकाकडे नेणे अशा गोष्टी करु नयेत. या गोष्टींमुळे विष उतरण्यास मदत होत नाही उलट सर्पदंश झालेल्या व्यक्तिलाच त्रास सहन करावा लागतो. यात वेळ घालविल्याने सर्पदंश झालेल्या व्यक्तिच्या जीवास धोका निर्माण होतो. त्याला लवकरात लवकर नजीकच्या इस्पितळात नेणे आवश्यक असते.)

## T = Tell the doctor of any systemic symptoms म्हणजे इस्पितळात आणेपर्यंत सर्पदंश झालेल्या व्यक्तिमध्ये कोणकोणती लक्षणे दिसून आली हे डॉक्टरांना सांगणे.

(लक्षणे जसे पापण्या जड होणे, अंधूक अथवा दुहेरी दिसणे, तोंडातून रक्तस्त्राव होणे अथवा अंगावर चट्टे उठणे हे डॉक्टरांना सांगितल्याने पुढील उपचारास मदत होते.)





बिनविषारी निमविषारी विषारी



© Raman Kulkarni

**Brahminy Worm Snake** वाळा
*Indotyphlops braminus*



© Raman Kulkarni

**Pied-bellied Shieldtail** खापरखवल्या
*Melanophidium* sp.



© Akshay Khandekar

**Montane Trinket Snake** पहाडी तस्कर
*Coelognathus helena monticollaris*



© Raman Kulkarni

**Banded Kukri Snake** पट्टेवाला कुकरी सर्प
*Oligodon arnensis*



© Raman Kulkarni

**Giri's Bronzeback Tree Snake**
*Dendrelaphis girii* रुकासर्प



© Raman Kulkarni

**Dumeril's Black-headed Snake**
*Sibynophis subpunctatus*



© Raman Kulkarni

**Checkered Keelback Water Snake**
*Xenochrophis piscator* पाण-दिवड



© Raman Kulkarni

**Buff-striped Keelback** नानेटी
*Amphiesma stolatum*


© Raman Kulkarni

**Beddome's Keelback** बेडॉमची नानेटी
*Hebius beddomei*


© Raman Kulkarni

**Indian Rat Snake / Dhaman** धामण
*Ptyas mucosa*


© Raman Kulkarni

**Travancore Wolf Snake** त्रावणकोर कवड्या
*Lycodon travancoricus*


© Raman Kulkarni

**Common Wolf Snake** कवड्या
*Lycodon aulicus*


© Kedar Bhide

**Common Sand Boa** डुरक्या घोणस
*Gongylophis conicus*


© Raman Kulkarni

**Whitaker's Boa** मांडुळ
*Eryx whitakeri*


© Raman Kulkarni

**Indian Rock Python** अजगर
*Python molurus molurus*


© Raman Kulkarni

**Olive Forest Snake**
*Rhabdops olivaceus*


© Raman Kulkarni

**Green Keelback** गवत्या
*Macropisthodon tlumbicolor*


© Raman Kulkarni

**Common Vine Snake** हरणटोळ
*Ahaetulla nasuta*


© Raman Kulkarni

**Brown Vine Snake** तपकीरी हरणटोळ
*Ahetulla pulverulenta*


© Raman Kulkarni

**Forsten's Cat Snake** फॉर्स्टनचा मांजऱ्या
*Boiga forsteni*


© Raman Kulkarni

**Common Indian Cat Snake**
*Boiga trigonata* सामान्य मांजऱ्या


© Raman Kulkarni

**Ceylon Cat Snake** सिलॉनचा मांजऱ्या
*Boiga* sp.


© Raman Kulkarni

**Malabar Pit Viper** मलबारी चापडा
*Trimeresurus malabaricus*


© Raman Kulkarni

**Bamboo Pit Viper** हिरवा चापडा
*Trimeresurus gramineus*

## विषारी व बिनविषारी साम्य असणारे साप


© Raman Kulkarni

**Indian Rock Python** अजगर
*Python molurus molurus*


© Raman Kulkarni

**Russell's Viper** घोणस
*Doboia russelii*


© Raman Kulkarni

**Common Wolf Snake** कवड्या
*Lycodon aulicus*


© Raman Kulkarni

**Common Indian Krait** मण्यार
*Bungarus caeruleus*


© Raman Kulkarni

**Common Indian Cat Snake** सामान्य मांजऱ्या
*Boiga trigonata*


© Raman Kulkarni

**Saw-scaled Viper** फुरसे
*Echis carinatus*


© Raman Kulkarni

**Indian Rat Snake** धामण
*Ptyas mucosa*


©Akshay Khandekar

**Spectacled Cobra** नाग
*Naja naja*



## नोंद

## नोंद

